International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# किशोर काळे यांच्या ‘कोल्हाट्याच पोर’ मधील स्त्रीजीवन

**डॉ. सर्वगोड नागीण चंद्रकांत[1], डॉ. देठे मीरा माधवराव[2]**

*[1]मराठी विभाग प्रमुख, उमा महाविद्यालय पंढरपूर*

*[2]उप-प्राचार्य व मराठी विभाग प्रमुख, दहिवडी कॉलेज दहिवडी*

*Corresponding Author – डॉ. सर्वगोड नागीण चंद्रकांत*

**DOI - 10.5281/zenodo.18654283**

**प्रस्तावाना:**

१९६० नंतर महाराष्ट्रामध्ये मराठी साहित्यामध्ये नव्या वांङ्मयीन चळवळी उभ्या राहिल्या त्यापैकी ‘दलित साहित्य चळवळ’ ही एक प्रमुख चळवळ म्हणावी लागेल. या चळवळीने केवळ मराठी साहित्य समृद्ध केले नाही तर, दलित साहित्याला एक नवीन ओळख निर्माण करून दिली. मराठी साहित्यामध्ये आजवर गावकुसाबाहेरचे अनुभव विश्व दलित साहित्याच्या रूपाने शब्दबद्ध केले गेले ते केवळ आणि केवळ दलित साहित्यातच. दलित साहित्यप्रकार हा मुळात सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतून उदयास आलेला असल्याने दलित साहित्यात जीवनाची बांधिलकी मांडली जाते. जीवनातील वास्तव समस्या आणि प्रश्न या सर्वांना दलित साहित्य सामोरे जाते. एका विशिष्ट संस्कृतीतून हे साहित्य निर्माण झाले आहे. मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या गरजा फक्त महत्त्वाच्या गरजा आहेत, परंतु त्याच्याही पुढे आपल्या मनातील भावविश्व शब्दबद्ध करणे, आपल्या उच्चतर समाधानासाठी आपण जे भोगले आहे या गोष्टी शब्दबद्ध करणे,याचे चित्रण दलित साहित्यामध्ये पहावयास मिळतात. माणूस फक्त धर्म, नीती, चालीरीती, परंपरा या गोष्टी निर्माण करत असला तरी या सर्वांनी मिळून एक संस्कृती निर्माण होते आणि अशा संस्कृतीक व्यवहारामधून उदयास येणाऱ्या अनेक बाबींचे आकलन दलित साहित्य संकल्पना समजून घेत असताना लक्षात येते.

**दलित साहित्य स्वरूप:**

१९५६ मध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्विकारून मानवतेचा मुक्ती लढा सर्व लोकांच्यासाठी खुला केला. खरंतर याचे रणशिंग महाडला फुंकले गेले, त्यावर मोहर उमटली ती येवल्याच्या सभेमध्ये ‘मी हिंदू म्हणून जलमलो परंतु हिंदू म्हणून मरणार नाही’ या नाऱ्यामध्ये. गुलामगिरी मधून मुक्त होण्याचा विचार व्यक्त झालेला पहावयास मिळतो. अनेक वर्षाच्या गुलामगिरीमध्ये अडकलेला गावकुसाबाहेरचा माणूस आपल्या संवेदना हरवून बसलेला होता या संवेदना दलित साहित्यातून आत्मनिर्भर बनण्यासाठी प्रेरणा देतात. त्याबरोबरच शतकानुशतके मानवी मनाचा दबलेला हुंकार व्यक्त झालेला पहावयास मिळतो.

भारतीय हिंदू संस्कृती ही मुळात उतरंडीच्या आकाराची आहे जो तळाशी राहतो त्याला वर येता येत नाही. तो तिथेच जन्मला जातो व तिथेच मरतो. अशा या सामाजिक बंधनाच्या चौकटीमध्येच चातुरवर्णाच्या व्यवस्थेमध्ये अन्यायी अशा जाती प्रथा पडलेल्या पहावयास मिळतात. यात सर्वात शेवटी राहतो तो दलित वर्ग, या विषमतेच्या व्यवस्थेत भरडला गेलेला या दलित वर्गात जाती पोट जाती आहेत. यामध्ये दलित वर्ग हा सुद्धा विभागला गेलेला होता यातही बलुतेदार आणि अलुतेदार असे दोन भाग विभाग पहावयास मिळतात. बलुतेदारांच्या

मध्ये असणारा समाज हा गावामध्येच पण गावकुसाबाहेर का होईना परंतु स्थिर होता, परंतु यांच्यामध्येही असणारा भटका जो समाज होता तो मात्र मजल दरमजल करत आपलं उदरभरण करत होता. म्हणजेच महार, मांग, चांभार या लोकांच्या तुलनेमध्ये भटक्या लोकांची अवस्था ही फार बिकट होती. इतर दलित समाज गाव कुसाच्या बाहेर एका ठिकाणी स्थिर राहत होता त्यामुळे तो संघटीत राहिला एकत्रित राहिला. परंतु भटक्या जमाती गावाबाहेर सतत भ्रमण करीत असल्याकारणाने भटक्या जमातींच्या मध्ये असंघटितपणा आढळतो त्यांच्या संस्कृतीमध्ये भाषेमध्ये रूढी परंपरेमध्ये सुद्धा आपल्याला भिन्नता पहावयास मिळते. या सर्वांचं पिचलेपण, पिळले,पण त्यांच्यावर झालेला अन्याय, अत्याचार, हा वेगळा होता. त्यांचा धर्म जात याव्यतिरिक्त केवळ माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दलित साहित्यामध्ये पहावयास मिळतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी' शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा' या आव्हानाला सर्वच थरांमधून प्रतिसाद मिळू लागला आणि मग मात्र दया पवार-बलुतं, लक्ष्मण माने -उपरा, शंकरराव खरात- तराळ अंतराळ, प्र.ई. सोनकांबळे- आठवणींचे पक्षी, पार्थ पोळके -आभरण, लक्ष्मण गायकवाड -उचल्या, शरणकुमार लिंबाळे -अक्करमाशी, नारायण सुर्वे- यादगार, नामदेव ढसाळ -खरंतर , बाबुराव बागुल -आम्हीही माणसं आहोत, किशोर शांताबाई काळे - कोल्हाट्याचं पोर, वामनदादा कर्डक -जग बदल घडवणारा, अशी अनेक पुरुष आत्मकथने मराठी साहित्यामध्ये लिहिले गेले आणि या आत्मकथनाने आपले स्वतःचे अस्तित्व सिद्ध केलेले आहे. दलित साहित्यामध्ये दलित आत्मकथनांनी स्वतःचा एक इतिहास घडवलेला आहे.

या दलित लेखकांच्या सोबतच दलित स्त्रीलेखिका सुद्धा मागे राहिलेल्या नाहीत. दलित पुरुषांच्या सोबतीनेच शिक्षण घेतलेल्या, आत्मभान आलेल्या,दलित स्त्रियांनी सुद्धा आत्मकथनाच्या माध्यमातून दलित साहित्यामध्ये मोलाची भर घातलेली आहे. बेबी कांबळे -जिन आमचं, विमल मोरे -तीन दगडाची चुल, उर्मिला पवार -आयदान, शांता गोखले- आम्हीही माणस आहोत, बेबी कांबळे माझीजडणघडण, शांता गोखले- जगण्याची लढाई, सुनिता कांबळे -संघर्ष मुक्ता सर्वगोड -मिटलेली कवाड या अनेक स्त्रीयांनी आपली आत्मभानातून आपले अनुभव शब्दबद्ध केले आहेत. अशी स्व कथन लिखाणाला सुरुवात झाली ही सर्व पुरुषांनी अथवा स्त्रियांनी लिहलेली लिहिलेली स्वकथने परंतु याच काळामध्ये एका पुरुषाने लिहिलेलं एका स्त्रीचे कथन म्हणजेच 'किशोर शांताबाई काळे' यांनी लिहिलेलं 'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनाचा प्रामुख्याने वेगळेपणा पहावयास मिळतो.

**कोल्हाट्याचं पोर या कथनाचे वेगळेपण:**

सन १९९४ सालात किशोर शांताबाई काळे यांनी लिहिलेलं 'कोल्हाट्याचं पोर' हे स्वकथन म्हणजेच एका पुरुषाने एका स्त्रीचा जीवनपट तिच्या भाव-भावना उलगडून दाखवण्याचा केलेला प्रयत्न आहे. यात कोल्हाटी समाजातील एका स्त्रीचे जीवन चित्रीत केलेलं आहे. मुळात कोल्हाटी स्त्रियांच्या जीवनाचा विचार केला तर, कोल्हाटी समाजातील पुरुषांनी आपल्याच घरातील आया बहिणींच्या जीवावर हौस- मौज करीत जगायचं आणि स्त्रियांनी आपल घर-दार, आई बापाच संसार चालवण्यासाठी, आपल्या वडील, भाऊ, मुलगा, पती यांच्यासाठी नाचगाणे करायचे अशी या समाजात प्रथा आहे. या आत्मकथनात आई शिवाय वाढलेल्या एका लेखकाचीच नाही तर त्याचबरोबर त्याच्या आईचीही आहे.

**कोल्हाट्याच्या पोरमधील स्री जीवन**:

सोलापूर जिल्ह्यातील करमाळा या गावच्या एसटी स्टँडवर फिरत असताना एका भोळसर, उदास, असाह्य अशा फिरत असणाऱ्या लक्ष्मी व तिच्या सोबत असणाऱ्या दोन लहान मुलांच्या कृष्णा कोल्हाटयाचे कडे लक्ष जाते. तो तिला आपल्या सोबत घरी आणतो, खरंतर लक्ष्मी ही साळी समाजाची आहे, परंतु कृष्णाने कोल्हाटी समाजातील लग्नाची पहिली बायको असतानाही लक्ष्मीला आणि तिच्यासोबत असणाऱ्या दोन मुलींना घरी आणलेले असते तो तिची पालन पोषणाची जबाबदारी घेतो. तिच्या मुलींचे जसे जसे वय वाढते तस तसं लक्ष्मीच्या मुली कोल्हाट्याचं नाचगाणे शिकू लागतात, एक तर कोल्हाटी समाजात मुलीने लग्न न करता ना करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे अशी प्रथा असल्याने लक्ष्मीला निमुटपणे सगळे पहावे लागते कारण कृष्णाने तिला सहारा दिलेला असतो.

किशोर काळे यांची आई शांताबाई शाळेत जात होती ती उपजत चांगली हुशार असल्याने आपण शिकून मास्तरीन होण्याचं स्वप्न तिने रंगवलेलं होते. परंतु लेखकाचे आजोबा तिला पुढचे शिक्षण घेऊ देत नाही तर, उलट पार्ट्यातून नाचगाणे करायला लावतात. कोल्हाटी समाजातील बाया कोणी कला म्हणून नाचतात, तर कोणी मजबुरीने पायात घुंगर बांधत असतात. मजबुरीत नसणाऱ्या स्त्रियांना जर कोणी दोन वेळेची भाकर पोटाला देणार असेल तर या स्त्रियांनी कायमचे नाचगाणं बंद करून लग्न केलेले नसतानाही एखाद्याशी एकनिष्ठपणे राहण्यासाठी तयार झाल्या असत्या. अशी यांची जगण्याची कथा असते. शांताबाईला सुद्धा नाईलाजाने पायात चाळ बांधून नाचावे लागते.

शांताबाई अशाप्रकारे समाजातील रुढीप्रमाणे पार्टी व तमाशाच्या फडात नाचू लागतात असे दिवस जातात आणि एक दिवस त्यांच्या रूपावर भाळून करमाळा तालुक्याचे आमदार नागोजीराव जगताप शांताबाईचा 'चिरा' उतरवतात. कोल्हाटी समाजामध्ये लग्नाची प्रथा नव्हती परंतु 'चिरा उतरवून' या प्रथेतून लाभलेला जो मालक असायचा त्याच्यासोबत त्या पत्नी सारख्या त्यांना राहावं लागत. शांताबाईचे मालक म्हणूनच नारायणराव जगताप काही दिवस तिच्याकडे येत असत यातूनच त्य गरोदर राहतात व लेखकाचा जन्म होतो. जसा मुलाचा जन्म होतो तसे आमदार महाशय मात्र शांताबाई कडे येणे कमी करतात आणि नंतर आजिबातच फिरकत नाही. पदरात मूल असल्याने शांताबाईला वडील, भाऊ आणि आपले मुल यांना जगविण्यासाठी परत पायामध्ये चाळ बांधून नाचायला लागतात. नाचताना अनेक प्रकारचा त्रास त्यांना सहन करायला लागतो. मुळात दिसायला सुंदर असणाऱ्या शांताबाईला तमाशामध्ये तमाशा पाहायला येणारी मंडळी खडे मारत, डोळे मारणे, अश्लील हातवारे करणे, कोणी कोणी अर्वाच भाषेत बोलणे हे सर्व त्या निमूटपणे सहन करायच्या या सर्वांचे चित्रण किशोर काळे यांनी अतिशय वास्तवपणे मांडून कोल्हाटी समाजातील स्त्रियांच्या जीवनाची व्यथा मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

या स्त्रियांना नाचगाणं करत यात्रेच्या निमित्ताने महाराष्ट्रभर प्रवास करावा लागत असे त्यात त्यांच्यावर अनेक बरे वाईट प्रसंग यायचे. पार्टीत येणारी कोणी व्यक्ती तिचा हात धरत असे, कोणी तिला मांडीवर बसवे, नको तिथे हात लावून चाळे करत असे अशावेळी स्त्रियांना नकोसे वाटत असले तरीही सगळे सहन केल्याशिवाय त्यांच्यासमोर पर्याय नव्हता पण अशावेळी समाजामध्ये वागणाऱ्या अशा पुरुषांना कोण अडवणार हाही मोठा प्रश्न पडलेला पहावयास मिळतो.

**संसारामध्ये रमणारी शांताबाई**:

किशोर काळे यांची आई शांताबाई ही अतिशय प्रामाणिकपणे जीवन जगू पाहणाररी स्त्री दिसते. तिने आपल्या सुखी संसाराचे स्वप्न पाहिलेले होते आणि ही स्वप्ने पूर्ण व्हावीत यासाठी तिची सतत धडपड चालू असायची. शांताबाईचा 'चिरा उतरविलेला मालक' आमदार नागोजीराव जगताप शांताबाईचा पदरामध्ये एक मुल टाकून परत तिच्याकडे फिरकतही नाही अशावेळी तिच्या मनाची झालेली घालमेल अस्वस्थ करणारी वाटते ज्याने चिरा उतरवलेला आहे तो त्या स्त्रीचा मालक असतो तो तिच्याशी कसाही वागला तरी तिला ते सगळे निमूटपणे सहन करावे लागते याचवेळी या चिरा उतरवणाऱ्या पुरुषाकडून मात्र तिच्या घरची मंडळी म्हणजे तिचे वडील, भाऊ पैसे ऐतखाऊ सारखे जीवन जगत असतात. हे सर्व शांताबाईच्या जीवनातही घडते नागोजीराव आपल्याला अंतर देणार नाही, त्याच्याशी लाभले लग्न झाले नाही त्यांना लग्नाची बायको आहे पण आपल्याला ते विसरणार नाहीत, आपण त्यांच्या लग्नाच्या बायको प्रमाणेच त्यांच्याशी प्रामाणिक राहून संसार करू असे सरळ साधे स्त्रीसुलभ स्वप्न शांताबाई पाहतात परंतु त्यांची निराशा होते. नागोजीराव त्यांना सोडून देतात. मग परत मात्र आपल्या बाळासाठी त्यांना परत पायामध्ये चाळ बांधावे लागतात, यावेळी आपल्या मुलाला चांगलं शिकवलं पाहिजे हा हेतू ठेवून वडील नसतानाही त्या किशोरला शाळेमध्ये घालतात. शाळेमध्ये नाव घालत असताना वडिलांच्या रकान्यामध्ये स्वतःचे नाव लावतात. पण किशोर साठी नाचगाणं करण्याशिवाय त्यांच्यासमोर दुसरा पर्याय नसतो. त्याला शिकवण मोठा करायचं हा एकच त्यांनी ध्यास घेतलेला असतो. त्याचवेळी कृष्णराव वडकर उर्फ नाना या शांताबाईच्या पार्टीमध्ये रोज येतात. शांताबाई त्यांना आवडतात परंतु शांताबाईने नाच गाणं बंद करून आपल्या सोबत राहावे हा नानांचा आग्रह असल्याने त्या नानाच्याबरोबर नानाला लग्नाची पहिली बायको असतानाही पत्नी सारखे राहतात. परत एकदा सुखाचा संसार करण्याचे स्वप्न रंगवतात, पण इथेही त्यांच्या पदरी निराशाच येते नानाला जुगाराचा नाद असतो, नानांपासून शांताबाईला दुसरा एक मुलगा होतो त्याला शाळेत घालताना शांताबाई आजोबाचं नाव वडिलांच्या रकानांमध्ये लावतात या मुलालाही नाना आपलं स्वतःचं नाव देत नाही. शांताबाईंना नानांबरोबर सुखाचा संसार करायचा असतो, नानांवर त्यांचा विश्वास असतो पण समाज मात्र तिला सुखाचा संसार करू देत नाही नाच गाण्यासाठी तिने परत एकदा स्टेजवर जावं अशी अवस्था निर्माण होते परंतु त्या मात्र जुगारात पडलेल्या नानाला सावरून त्याच्याशी प्रामाणिकपणे संसार करण्याचा प्रयत्न सोडत नाही.

**अंधश्रद्धा व कोल्हाटी समाज**:

आज कोल्हाटी समाजामध्ये नव्हेच तर समस्त समाजामधील स्त्री अंधश्रद्धेचा बळी ठरलेली आहे. यात कोल्हाटी समाजाचा विचार केला तर 'चिरा उतरवणे' ही एक अघोरी प्रथा या समाजामध्ये पहावयास मिळते. ज्यामुळे कोल्हाटी समाजातील स्त्री च्या दुःखाचे मूळ दडलेले आहे. वयात आलेल्या स्त्रीचा 'चिरा उतरवणे' हा समाजातील इतर लोकांच्या दृष्टीने आनंदाची बातमी मांणली जाते, आनंदाची गोष्ट समजली जाते परंतु घरातील वडील, भाऊ आणि घरातील इतर मंडळी ज्या मुलीचा चिरा उतरवणार आहेत तिच्या मनाचा कोणताही विचार करत नाही. तर उलट त्या मुलीला लग्नातल्या नव्या नवरीसारखे सजवून, नटवून पैसे देणाऱ्या मालकाच्या हवाली करतात. चिरा उतरविणारा माणूस पैसे देतो आणि स्त्रीच्या शरीराचा मालक होतो. कधी कधी तर चिरावणार हा माणूस रोज येऊ लागतो. त्याला कोणी काहीही म्हणत नाही

व चिरा उतरविणारी स्त्रीही त्यांना विरोध करू शकत नाही कारण तिने जर विरोध केला तर, घरामध्ये येणारा पैसा बंद होतो. घराला सांभाळणार सांभाळण्याची जबाबदारी तिच्यावर असल्याने ती निमुटपणे सहन करत राहते. कोल्हाटी समाजामध्ये जवळपास सर्वच स्त्रिया ही प्रथा ना इलाज म्हणून स्वीकारतात. कारण अंधश्रद्धेच्या मधून हे सर्व तिच्यावर लादले जाते. अंधश्रद्धे मधुन पाळली जाणारे दुसरी एक गोष्ट म्हणजे स्त्रीला जर मासिक पाळी आली तर तिचा घरामध्ये विटाळ मानला जातो अशावेळी तिने घरात कोणत्याही वस्तूला हात लावायचा नाही, घराबाहेर जायचे नाही, कोणाशी बोलायचं नाही, या दोन्हीही अंधश्रद्धेच्या गोष्टींचा विचार केला तर यामागे केवळ पुरुषी भावना असतेच असे नाही तर एक स्त्री दुसऱ्या स्त्रीला तशाच पद्धतीने वागवत असते.

**कोल्हाट्याचे पोरमधील समाजजीवन**:

कोल्हाटी समाजामध्ये एखाद्या स्त्री किंवा पुरुष याच्यावर अन्याय झाला तर त्यांना कोर्टामध्ये दाद मागता येत नाही, तर आपल्याच समाजातील जात पंचायतीकडे त्यांना न्याय मागावा लागतो. ही जात पंचायत वर्षातून एक दिवस एखाद्या गावामध्ये भरविली जाते. त्यांच्याच समाजातील ज्येष्ठ मंडळी पंच म्हणून काम पाहत असतात ही पंचमंडळी सांगतील तो न्याय व देतील ती शिक्षा हाच अंतिम निर्णय असतो. त्यांच्या विरोधात कुणालाही जाता येत नाही अशाच एका कुसुम नावाच्या स्त्रीचे चित्र जात पंचायतीच्या न्यायाच्या माध्यमातून किशोर काळे यांनी केलेले आहे. ती म्हणजे कुसुम होय. कुसुम इतर स्त्रियांच्या प्रमाणे नाचगाणे करून आपल्या घराची जबाबदारी उचलत असते. परंतु रोजच्या नाचगाण्याला कंटाळून ती एका महाराच्या मुलाबरोबर पळून जाते. त्याच्यासोबत राहताना तिला एक मुलगा होतो अशावेळी कोल्हाटी समाजातील स्त्री महाराबरोबर पळून गेली म्हणून जात पंचायत तिला आणि तिच्या घरच्या सर्वांना वाळीत टाकते, जातीतून बाहेर टाकण्याचा धाक दाखवते, कारण आपल्या समाजातील व्यक्ती सोडून दुसऱ्या जातीतील व्यक्तीबरोबर तिने राहणे हे पंचायतीला मान्य होत नाही, अशावेळी तिला झालेला मुलगा तिला सोबत आणता येत नाही, मुलासाठी ती झुरत राहते मुलाची व आईची झालेली ताटातूट हरीनाना नावाचा एक व्यक्ती दूर करण्याचा प्रयत्न करतो तर त्यालाच पंचायत येते लोक शिक्षा देतात. त्याला गुन्हेगार ठरवले जाते. कुसुम २० वर्षांनी आपल्या समाजामध्ये येते तरीही तिला कोल्हाटी समाज सामावून घ्यायला नकार देतो. याचं वास्तव चित्रण पाहताना ज्या समाजामध्ये तिची घरची मंडळीच तिला मानाने जगू देत नाहीत, तिच्या शरीराचा सौदा करतात, तिने नाच गाणे करून आपले शरीर कुणाच्यातरी हवाले करून दिलेल्या पैशावर घरची सगळी मंडळी जगतात, त्याबद्दल त्यांना काहीही वाटत नाही परंतु आपल्या समाजातील एक मुलगी अपमानाचे जीवन सोडून, अपमानाचे जगणे सोडून मानाने उभी राहण्याचा प्रयत्न करत असते, ही मात्र स्त्रीच्या दृष्टीने बंडखोरी ठरली जाते.

**कोल्हाट्याचं पोर आत्मकथनाचे वेगळेपण**:

'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनामध्ये किशोर शांताबाई काळे यांनी आपल्या बालपणापासून तर एम.बी.बी.एस. पदवी घेईपर्यंतचा प्रवास चित्रित केलेला आहे. आपल्या आत्मकथनाबाबत ते म्हणतात की, 'माझी कथा ही समाजाने नाकारलेल्या, आई-वडिलांच्या प्रेमापासून वंचित राहिलेल्या, गरिबीने लाचार, आणि कोल्हाटी समाजातील नाचणारीच्या पोटी जन्म घेऊन डॉक्टरकी शिकलेल्या एका पोराची आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित होऊन शिकलेला हा मुलगा समाजापुढे आपलं दुःख मांडत असताना, आपली वेदना

शब्दबद्ध करत असताना, सांगतो की, 'बापाचा पत्ता नाही, रक्ताचा भाऊ आहे परंतु त्याचे कागदोपत्री नाव वेगळे, आई कोल्हाट्याची, अशारीतीने आम्हा तीन जणांना तीन तुकड्यांच्या मध्ये विभागले गेला आहे.'

शिक्षणाच्या निमित्ताने हळूहळू समजलेला किशोर मात्र आपल्या आईचं जगणं जवळून पाहत असतो. गवळी शिक्षकांच्या पुढाकारांना किशोरच नाव शाळेत टाकतात पण नावापुढे शांताबाई काळे हे नावा लावले जाते. आईचे नाव लावले म्हणून मुलांच्या मध्ये थट्टेचा, चर्चेचा विषय झालेला. शाळा शिकता शिकता गाय, म्हैस, बैल, कोंबड्या राखणे, आजीची भाकरी रानात पोहोचवणे, घरी येणाऱ्या जाणाऱ्या पाहुण्यांचा पाहुण्यांची उठाठेव करणे ही कामे करत करत तो शिकतो. बार्शीला बेबी मावशीच्या सोबत शिकण्यासाठी गेल्यानंतरही पार्टीमध्ये नाचत असणाऱ्या स्त्रियांच्या लहान मुलांना सांभाळण्याची जबाबदारी किशोरवर पडते. त्यातच त्याचं बालमन कोमेजून जातं, शाळेमध्ये पुस्तके घ्यायला पैसे नाहीत, स्कॉलरशिपला मिळालेले पैसेही आजोबांच्या हातामध्ये द्यायला लागतात. अशा वेळी आईपासून लांब राहण्याची जाणीव त्याला होते. अशारीतीने बारावीपर्यंत शिक्षण होईपर्यंत आईचं प्रेम त्याला मिळत नाही. बारावी मध्ये चांगले मार्क मिळाल्यामुळे मागास वर्गीय विद्यार्थ्यांच्या मध्ये दुसऱ्या आलेल्या किशोरला मुंबई येथील मेडिकल कॉलेजच्या प्रथम वर्षाला प्रवेश मिळतो.

त्याच्या या घवघवीत यशाबद्दल त्याचा सत्कारही होतो हा सत्काराचा प्रसंग मात्र त्याच्या आयुष्यामध्ये अनेक चांगल्या क्षणांच्या मध्ये स्मरणात राहणारा असा क्षण आहे त्यामुळे आपल्या आजवरच्या खडतर आयुष्यामध्ये हा आनंदाची हिरवळ पेरून जातो. शिक्षण घेत असताना शिक्षण अनेक खडतरा अपमानाचे प्रसंग किशोर वर येतात परंतु त्यांनाही सावरून तो डॉक्टरीची परीक्षा पास होतो.

**निष्कर्ष:**

हा किशोरचा मनालाही वेदना देणारा प्रवास पाहिल्यानंतर किशोरची आई शांताबाई काळे यांच्या वाटायला आलेला भोग पाहिला तर कोल्हाटी समाजामध्ये त्याकाळी स्त्रियांना मिळणारी वागणूक किती वेदना देणारी होती हे लक्षात येते. संसाराचे स्वप्न पाहणारी शांताबाई दरवेळी आपले संसाराचे स्वप्न भंग झालेले पाहते त्यावेळेस तिच्या मनाची अवस्था शब्दांमध्ये सुद्धा व्यक्त करता येणार नाही. दोनदा नवऱ्याने नाकारलेली एक स्त्री केवळ आणि केवळ आपल्याला दोन वेळचं पोटाला खायला मिळेल या हेतून एका पुरुषाचा आधार घेऊ पाहते, त्यावेळेस मात्र चातुरवर्णी व्यवस्थेमधील स्त्रियांच्या वाट्याला आलेली ही वागणूक आहे ही किती हीन दर्जाची आहे याची प्रचिती येते.

कोल्हाटी समाजामध्ये घरामध्ये मुलगी जन्माला आली तर आनंदाने तिचे स्वागत केले जाते. ती जोपर्यंत वयात येत नाही तोपर्यंत तिचे कोड कौतुक केले जाते, पण ती वयात आली रे आली की तिचेच जन्मदाते आई-वडील जो व्यक्ती तिचा चिरा उतरून त्या बदल्यात जास्तीत जास्त पैसे आपल्याला देईल, त्याच्या हवाली हा कोवळा जीव करत असताना आपल्या मुलीला काय वाटेल? आपल्या मुलीच्या मनामध्ये दुसऱ्या काही भावना आहेत का? याचा क्षणभरही विचार करत नाही, तर उलट मुलगी जेवढी जास्त देखणी तेवढा तिला येणारा पैसा जास्त व जास्त पैसा मिळाला तर घरच्या मंडळींना सुखाने जगता येईल असे सरळ गणित कोल्हाटी समाजाच्या मनाची मानसिकता असते. अशावेळी कोल्हाटी समाजात जन्माला येणे, त्यातल्या त्यात स्त्री म्हणून जन्माला येणे आणि स्त्रीसुलभ भावना बाजूला सारून आई-वडिलांचा, भावाचा संसार, सुखाचा करण्यासाठी आपल्या तारुण्याची राख रांगोळी करणे, आपल्या भावनांचा जुराडा झाला तरी चालेल,

आपलं तारुण्य आपल्या मनाविरुद्ध कोणी ओरबाडलं तरी चालेल, मग तो तरुण असू दे, वृद्ध असू दे ,विवाहित असू दे व अविवाहित असू दे याचा विचार करण्याची मुभा या समाजातील स्त्रियांना नाही, एवढेच नाही तर आपल्या पोटच्या मुलालाही मन भरून प्रेम करण्याचा अधिकार तिला नाकारला जातो. पार्ट्यांमध्ये नाच गाणे करत असताना तंबूमध्ये रडणाऱ्या तान्ह्या बाळाचा आवाज, त्याचे रडणे कानावर जरी पडले तरी त्याच्याकडे कानाडोळा करून आपले पाय थांबायला नको आपल्या चेहऱ्यावरचे हास्य तसंच राहिलं पाहिजे या सगळ्यांचा विचार ज्यावेळेस स्त्री वादी साहित्य करतात त्यावेळेस आपण स्त्रीवादी साहित्य कोणत्या चौकटी बसवावे? स्त्रीवादी साहित्यावरील कोणती कोणती बंधने झुगारून द्यावी? याचा विचार समीक्षकांना पडल्याशिवाय निश्चित राहणार नाही.

**समारोप**:

किशोर शांताबाई काळे यांनी एम.बी.बी.एस. ची परीक्षा पास झाल्यानंतर सन १९९४ मध्ये किशोर शांताबाई काळे यांनी 'कोल्हाट्याचं पोर' हे आत्मकथन लिहिले आणि आत्मकथन साहित्याच्या जगतामधल्या आत्मकथनाच्या कक्षा वृंदावल्या गेल्या. ज्यावेळेस एक स्त्रीच स्वतःचे जगणे, भोगणे, शब्दबद्ध करते त्यावेळेस त्या स्त्रीच्या लिहिण्याला एक प्रकारचा कंगोरा असतो, पण ज्यावेळी एक पुरुष एका स्त्रीचे मग त्या पुरुषाच्या आईचे का होईना जीवनकथन शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न ज्या वेळेस करत असतो, त्यावेळेस मात्र स्त्री आत्मकथनाचे कंगोरे गळून पडतात, एवढेच नाही तर पुरुषांच्या नजरेतून स्त्रीआत्मकथन ज्यावेळेस आपण वाचतो त्यावेळेस, मात्र ते आत्मकथन फक्त कोल्हाटी समाजामधील नाच गाणे करून आपल्या मुलाने मोठे व्हावे हे स्वप्न पाहणाऱ्या एका शांताबाई काळयांचं नाही तर आजही कोल्हाटी समाजामध्ये नाच गाणे करून आपण जे जगतो आहोत जे भोगतो आहोत, ते आपल्या मुलांच्या वाटायला येऊ नये अशी स्वप्न डोळयांमध्ये घेऊन पायामध्ये चाळ बांधणाऱ्या आणि लोकांच्या लोकांचे मनोरंजन करणाऱ्या समस्त कोल्हाटी समाजातील स्त्री वर्गाचे आहे यात शंका नाही.

**संदर्भ ग्रंथ:**


1. काळे किशोर शांताबाई, 'कोल्हाट्याचं पोर'- ग्रंथाली प्रकाशन मुंबई
2. कोतापल्ले नागनाथ, दत्ता भगत, शरणकुमार लिंबाळे- 'ग्रामीण दलित व श्रीवादी साहित्य' यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक प्रथम आवृत्ती २००१
3. कुलकर्णी गोमा दलित साहित्य एक सामाजिक सांस्कृतिक अभ्यास सुगावा प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती १९९२
4. मनोहर यशवंत आंबेडकरवादी मराठी साहित्य भिमरत्न प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती १९९९